## सुविचार

माणूस किती बोलतो यापेक्षा, तो किती जबाबदारीने निर्णय घेतो यावर नेतृत्व ठरतं; कारण योग्य निर्णयच समाजाला दिशा देतात आणि विश्वास निर्माण करण्याचे काम करतात.

दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


## नक्षलवाद: निधीत वाढ

**नवी दिल्ली :** केंद्रीय अर्थसंकल्पात नक्षलवादाचा मुकाबला करण्याच्या धोरणाचा भाग म्हणून सुरक्षा आणि पायाभूत सुविधांच्या खर्चासाठी ३,६१०.८० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, जी २० टक्क्यांहून अधिक आहे. गृह मंत्रालय ३१ मार्चपर्यंत देशातून डाव्या विचारसरणीच्या अतिरेकीवादाचे उच्चाटन करण्याचा प्रयत्न करत आहे. सुरक्षा संबंधित खर्च आणि नक्षलग्रस्त भागांसाठी विशेष पायाभूत सुविधा योजनेसाठी ३,६१०.८० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | सोमवार, दि. ०२ फेब्रुवारी, २०२६ | वर्ष - १ | अंक - १३० | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### जम्मू-काश्मीरचे अधिवेशन आजपासून

**जम्मू :** सोमवारपासून येथे सुरू होणारे जम्मू आणि काश्मीर विधानसभेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन वादळी ठरण्याची शक्यता आहे कारण राजकीय पक्ष सरकारच्या निवडणूक आश्वासनांवर, विशेषतः राज्य पुनर्संचयनाबद्दल प्रश्न विचारण्याच्या तयारीत आहेत. मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला, ज्यांच्याकडे अर्थखाते देखील आहे, ते ६ फेब्रुवारी रोजी अर्थसंकल्प सादर करणार आहेत. अब्दुल्ला यांनी गेल्या वर्षी ७ मार्च रोजी त्यांचे पहिले अर्थसंकल्प सादर केले होते. २ फेब्रुवारी रोजी उपराज्यपाल मनोज सिन्हा यांच्या अभिभाषणाने अधिवेशन सुरू होईल.

### केरळच्या मुख्यमंत्र्यांची अर्थसंकल्पावर टीका



**तिरुवनंतपुरम :** केरळचे मुख्यमंत्री पिनारायी विजयन यांनी रविवारी केंद्रीय अर्थसंकल्पावर जोरदार टीका केली आणि म्हटले की, या अर्थसंकल्पातून केंद्राचा राज्याप्रती असलेला सततचा भेदभाव आणि दुर्लक्ष उघड झाले आहे. येथे दिलेल्या निवेदनात विजयन म्हणाले की, अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी जाणूनबुजून केरळ हा भारताच्या नकाशाचा भाग आहे या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष केले आहे. संसदेत सादर केलेल्या अर्थसंकल्पावर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करताना त्यांनी सांगितले की, एम्स, सात हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर आणि विझिंजम बंदरासाठी विशेष पॅकेज यासह राज्याच्या दीर्घकालीन मागण्या पूर्णपणे दुर्लक्षित करण्यात आल्या आहेत.

## आरोग्य-पायाभूत सुविधांना प्राधान्य; मध्यमवर्गाची मात्र निराशा

# देशांतर्गत मागणीला चालना देणारा अर्थसंकल्प

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज, १ फेब्रुवारी रोजी संसदेत २०२६-२७ चा केंद्रीय अर्थसंकल्प सादर केला. भू-राजकीय तणाव, जागतिक आर्थिक मंदीची भीती आणि आंतरराष्ट्रीय बाजारातील अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर सादर झालेला हा अर्थसंकल्प देशाच्या आर्थिक विकासाचे मुख्य इंजिन म्हणून देशांतर्गत मागणी मजबूत करण्यावर केंद्रित असल्याचे स्पष्ट झाले.

२०२५-२६ च्या आर्थिक सर्वेक्षणातील सकारात्मक आकडेवारीचा आधार घेत अर्थमंत्र्यांनी भारताचा संभाव्य विकासदर सुमारे ७ टक्के राहील, असा विश्वास व्यक्त केला. या पार्श्वभूमीवर पायाभूत सुविधा, आरोग्यसेवा, रोजगारनिर्मिती आणि तंत्रज्ञान क्षेत्राला चालना देणाऱ्या अनेक घोषणा करण्यात आल्या. मात्र, आयकर सवलती किंवा थेट आर्थिक दिलासा देणाऱ्या उपाययोजनांचा अभाव असल्याने मध्यमवर्ग आणि आयकरदाते वर्गामध्ये अपेक्षाभंगाची भावना दिसून आली.

आरोग्य क्षेत्राबाबत संवेदनशील भूमिका घेत अर्थमंत्र्यांनी १७ कर्करोगावरील औषधांवरील मूलभूत सीमाशुल्क रद्द करण्याचा प्रस्ताव मांडला. यासोबतच दुर्मिळ आजारांवरील आणखी सात औषधे शुल्कमुक्त यादीत समाविष्ट करण्यात आली आहेत. यामुळे गंभीर आजारांवरील उपचार अधिक परवडणारे होतील, असा सरकारचा दावा आहे. आरोग्य मनुष्यबळ वाढवण्यासाठी पुढील पाच वर्षांत १,५०,००० जेरियाट्रिक केअर गिव्हर्स आणि १,००,००० आरोग्य व्यावसायिकांना प्रशिक्षण देण्याची योजना जाहीर करण्यात आली आहे. शिक्षण आणि रोजगार यांचा मेळ घालण्यासाठी एक उच्चस्तरीय समिती स्थापन केली जाणार आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानल्या जाणाऱ्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना (एमएसएमई) अधिक सक्षम करण्यासाठी अर्थसंकल्पात भरीव तरतुदी करण्यात आल्या आहेत. भारताला जागतिक तंत्रज्ञान केंद्र बनवण्याच्या दिशेने इंडिया सेमीकंडक्टर मिशन २.० सुरू करण्यात आले असून, यासाठी ४०,००० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

एमएसएमईसाठी १०,००० कोटी रुपयांचा एसएमई ग्रोथ फंड आणि आत्मनिर्भर भारत फंडमध्ये २,००० कोटी रुपयांचा टॉप-अप जाहीर करण्यात आला आहे. तसेच, २०४७ पर्यंत परदेशी तंत्रज्ञान कंपन्यांना करसवलती देऊन भारताला क्लाउड सेवांचे जागतिक केंद्र बनवण्याचा सरकारचा मानस आहे.

महिलांच्या आर्थिक सबलीकरणासाठी 'लखपती दीदी' योजना सुरू ठेवण्याची घोषणा अर्थमंत्र्यांनी केली. या योजनेअंतर्गत महिला बचत गटांना ५ लाख रुपयांपर्यंत व्याजमुक्त कर्ज दिले जाते. या कर्जावर सरकारी अनुदानही उपलब्ध असून, ग्रामीण भागातील महिलांना आर्थिक स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या दृष्टीने ही योजना महत्त्वाची मानली जाते. याशिवाय, सात रेल्वे कॉरिडॉर आणि दिव्यांग सहारा योजना जाहीर करून वाहतूक व सामाजिक सुरक्षेवरही लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

सर्वसामान्यांसाठी महत्त्वाची घोषणा करत अर्थमंत्र्यांनी रस्ते अपघात विमा दाव्यांवरील व्याजावर टीडीएस कापला जाणार नाही, असे स्पष्ट केले. आतापर्यंत अपघात भरपाईवर मिळणाऱ्या ५०,००० रुपयांपेक्षा अधिक व्याजावर टीडीएस कापला जात होता आणि ते उत्पन्न म्हणून करपात्र धरले जात होते.

अपघात प्रकरणांमध्ये न्यायालयीन प्रक्रिया दीर्घकाळ चालत असल्याने पीडितांना प्रत्यक्ष नुकसान सहन करावे लागते. न्यायाधिकरण साधारणतः दावा दाखल केल्याच्या तारखेपासून देयकाच्या तारखेपर्यंत ६ ते ९ टक्के साधे व्याज देण्याचे आदेश देतात. आता ही संपूर्ण व्याजाची रक्कम करमुक्त राहणार असल्याने अपघातग्रस्तांना प्रत्यक्ष लाभ होणार आहे.

आरोग्य, उद्योग, तंत्रज्ञान आणि पायाभूत सुविधा या क्षेत्रांमध्ये सकारात्मक घोषणा असल्या, तरी आयकर सवलती, करस्लॅबमध्ये बदल किंवा थेट रोख दिलासा नसल्याने मध्यमवर्गासाठी हा अर्थसंकल्प फारसा दिलासादायक ठरलेला नाही. वाढती महागाई, शिक्षण व आरोग्य खर्चाच्या पार्श्वभूमीवर मध्यमवर्गाला अधिक अपेक्षा होत्या.

# राज्यसभेच्या जागेसाठी जय पवारांचे नाव चर्चेत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** सुनेत्रा पवार विधानसभेच्या सदस्य झाल्यानंतर त्यांना राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा द्यावा लागणार आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसकडील राज्यसभेची एक जागा रिक्त होणार असून, त्या जागेवर कोणाची वर्णी लागणार, याबाबत राजकीय वर्तुळात तर्क-वितर्कांना उधाण आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सुरुवातीला पार्थ पवार यांच्या नावाची चर्चा असली तरी, ऐनवेळी जय पवार यांचे नाव पुढे येण्याची शक्यता अधिक मानली जात आहे. पार्थ पवार यांच्याबाबत भाजप अनुकूल नसल्याची चर्चा असून, पुण्यातील कथित जमीन व्यवहार प्रकरणी सुरू असलेल्या चौकशीमुळे त्यांच्या नावाला भाजपकडून विरोध होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. याच कारणामुळे राष्ट्रवादीकडून पर्यायी चेहरा म्हणून जय पवार यांचे नाव पुढे केले जाऊ शकते. माहितीनुसार, जय पवार यांच्या नावाला भाजपकडून फारसा विरोध होण्याची शक्यता नाही. त्यामुळे सुनेत्रा पवार यांनी राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यानंतर, राष्ट्रवादीकडून जय पवार यांना वरिष्ठ सभागृहात पाठवण्याचा पर्याय अधिक व्यवहार्य मानला जात आहे.

दरम्यान, सुनेत्रा पवार तात्काळ राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा देतील, अशी शक्यता कमी आहे. उपमुख्यमंत्री झाल्या असल्या तरी, विधिमंडळाच्या सदस्य होईपर्यंत त्या राज्यसभा खासदार म्हणून कामकाज करू शकतात. पक्षानेही सध्या राजीनाम्याची घाई नसल्याचे संकेत दिले आहेत. बारामती विधानसभा पोटनिवडणुकीनंतर सुनेत्रा पवार राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा देण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## महाराष्ट्रासाठी भरीव तरतूद : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

# केंद्रीय अर्थसंकल्प देशाला दिशा देणारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी सादर केलेला अर्थसंकल्प देशाच्या अर्थव्यवस्थेला दिशा, निधी आणि गती देणारा सर्वसमावेशक अर्थसंकल्प असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्रासाठी भरीव आर्थिक तरतूद करण्यात आल्याने राज्याच्या विकासाला मोठी चालना मिळणार असल्याचेही त्यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

अर्थसंकल्पात ५ लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या टियर–टू आणि टियर–थ्री शहरांमधील विकास केंद्रांना बळकटी देण्यासाठी अनेक महत्त्वाचे पायाभूत सुविधा प्रकल्प जाहीर करण्यात आले आहेत. महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक शहरीकरण झालेले राज्य असून, येथे अशा शहरांची संख्या मोठी आहे. त्यामुळे या योजनांचा राज्याला मोठा लाभ होणार असून शहरांच्या सर्वांगीण विकासाला गती मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

या अर्थसंकल्पात पायाभूत सुविधांसाठी तब्बल १२ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येणार आहे. दहा वर्षांपूर्वी या क्षेत्रासाठी केवळ १ लाख कोटी रुपयांची तरतूद होती, यावरून सध्याच्या गुंतवणुकीचे महत्त्व अधोरेखित होते, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. तसेच महिला नेतृत्वाखालील उद्योगांना प्रोत्साहन देण्यात आले असून प्रत्येक जिल्ह्यात महिलांसाठी हॉस्टेल उभारण्याची तरतूद करण्यात आली आहे. महिला आणि शेतकऱ्यांसाठीही अर्थसंकल्पात भरीव तरतूद असल्याचे त्यांनी नमूद केले.

शेतकऱ्यांच्या शेतमालाला भाव आणि थेट बाजारपेठेशी जोडणी यासाठीच्या विविध योजनांचा उहापोह या अंतरिम अर्थसंकल्पातून करण्यात आला आहे. विकासाची दिशा सांगणारा पण त्याचवेळी आर्थिक शिस्त पाळणारा, असा हा अंतरिम अर्थसंकल्प आहे. विकसित भारताचा रोडमॅप पूर्णकालीन अर्थसंकल्पातून येईल. हा आत्मविश्वास देणारा सुद्धा हा अर्थसंकल्प आहे, असेही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

मुंबई–पुणे हायस्पीड कॉरिडॉरमुळे महाराष्ट्राच्या विकासाला वेग येणार असून, यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात राज्याला सुमारे १ लाख कोटी रुपयांचा निधी मिळणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. यासोबतच विविध केंद्र सरकारच्या योजनांमधूनही राज्याला मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध होणार आहे. शेती, पशुपालन आणि मत्स्यव्यवसायालाही या अर्थसंकल्पातून चालना मिळणार असून, 'विकसित भारत'च्या दिशेने वाटचाल करताना महाराष्ट्राची भूमिका अधिक बळकट होणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# मणिपूरमध्ये सरकार स्थापनेच्या हालचालींना वेग

## २० हून अधिक भाजप आमदार दिल्लीत दाखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**इम्फाळ :** मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवटीचा कालावधी संपण्याच्या पार्श्वभूमीवर राज्यात सरकार स्थापनेच्या हालचालींना वेग आला आहे. भाजपचे २० हून अधिक आमदार, पक्षाचे राज्य युनिट अध्यक्ष यांच्यासह, रविवारी पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वाशी चर्चा करण्यासाठी नवी दिल्लीला रवाना झाले.

मणिपूर भाजप अध्यक्ष अधिकारीमयम शारदा देवी यांनी इंफाळ विमानतळावर पत्रकारांशी बोलताना सांगितले की, "सर्व एनडीए आमदारांना बैठकीसाठी बोलावण्यात आले आहे. आम्हाला आशा आणि विश्वास आहे की राज्यात लोकप्रिय सरकार स्थापन होईल."

माजी मुख्यमंत्री एन. बिरेन सिंह यांनीही सकारात्मक संकेत देत सांगितले, "एनडीएतील सर्व आमदारांना बैठकीसाठी आमंत्रित करण्यात आले आहे. त्यामुळे सकारात्मक निर्णय होण्याची अपेक्षा आहे. याआधी भाजप आमदारांची स्वतंत्र बैठक झाली होती. राष्ट्रपती राजवटीचा कार्यकाळ १२ फेब्रुवारी रोजी संपत आहे. त्यामुळे लवकरच काहीतरी ठोस घडेल, अशी आशा आहे." आपण सत्तेत असतो तर परिस्थिती वेगळी असती का, या प्रश्नावर सिंह म्हणाले, "सरकार ही एक सतत चालणारी प्रक्रिया आहे. माझ्या कार्यकाळात मणिपूरमधील भौगोलिक आणि सामाजिक परिस्थिती सुधारण्यासाठी मी सर्वोत्तम प्रयत्न केले. डोंगर आणि खोऱ्यांमध्ये अनेक बदल घडले आहेत."

दरम्यान, लमसांग मतदारसंघाचे आमदार एस. राजेन सिंह यांनी सरकार स्थापनेची शक्यता व्यक्त करताना सांगितले, "केंद्र सरकार राज्यातील परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर नेतृत्वाचा निर्णय घेईल. ही बैठक सोमवारी संध्याकाळी होण्याची शक्यता आहे." आमदार एच. डिंगो यांनीही बैठकीची वेळ सोमवारी संध्याकाळची असल्याचे सांगितले; मात्र अजेंडा अद्याप जाहीर करण्यात आलेला नाही, असे स्पष्ट केले. "आम्हाला आजच दिल्लीत पोहोचण्याचे निर्देश देण्यात आले होते," असे ते म्हणाले. खुराई मतदारसंघाचे आमदार एल. सुसिंद्रो यांनी मात्र दिल्लीतील बैठकीबाबत आपल्याला कोणतीही अधिकृत माहिती मिळालेली नसल्याचे सांगितले. उर्वरित भाजप तसेच एनडीएतील आमदारही रविवारी संध्याकाळी उशिरा दिल्लीत पोहोचण्याची शक्यता आहे.

मे २०२३ पासून मणिपूरमध्ये मेतेई आणि कुकी-झो समुदायांतील वांशिक हिंसाचारात २६० हून अधिक नागरिकांचा मृत्यू झाला असून, हजारो लोक बेघर झाले आहेत. या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय अस्थिरता अधिक तीव्र झाली होती. गेल्या वर्षी १३ फेब्रुवारी रोजी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिल्यानंतर एन. बिरेन सिंह यांच्या सरकारनंतर राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली. २०२७ पर्यंत कार्यकाळ असलेली मणिपूर विधानसभा सध्या निलंबित अवस्थेत आहे.

### लाडक्या बहिणींना २१०० रुपये देणार



**कोल्हापूर :** कागल येथे झालेल्या जाहीर सभेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लाडक्या बहिणी योजनेबाबत ठाम भूमिका मांडली. लाडक्या बहिणींना लखपती केल्याशिवाय थांबणार नाही, तसेच लवकरच त्यांना २१०० रुपये दिले जातील, असे त्यांनी सांगितले. महिलांच्या पाठिंब्यावरच उमेदवाराचा विजय ठरतो, असेही ते म्हणाले. दर महिन्याला ओवाळणी देणारा भाऊ आज विनंती करायला आला आहे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी त्यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना अभिवादन केले. ही लढाई जनशक्ती विरुद्ध धनशक्तीची असून अखेर जनता योग्य निर्णय घेते, असे शिंदे म्हणाले.

# आठवणीतल्या दादांची अर्थसंकल्पीय प्रतिक्रिया

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** आज मोदी सरकारने अर्थसंकल्प सादर केला, आणि यावेळी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आठवणींना आर्थिक विश्लेषकांनी उजाळा दिला. त्यांच्या दृष्टिकोनातून अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया कशी आली असती, असा अंदाज म्हणून व्यक्त होत आहे.

अजित पवार हे कृषी आणि ग्रामीण विकासासाठी नेहमीच कटिबद्ध असायचे. त्यांचा दृष्टिकोन असा असतो की, "शेतकरी हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा पाया आहे. त्यांनी फक्त समर्थन मूल्य आणि थेट आर्थिक मदत मिळावी इतकी अपेक्षा नाही; आधुनिक तंत्रज्ञान, सिंचन, बियाणे आणि सेंद्रिय शेतीसाठीही धोरणात्मक पावले आवश्यक आहेत." अर्थसंकल्पात पीएम-किसान, सिंचन योजना, आणि कृषी संशोधनावर भर दिला असेल, तर याचे कौतुकाने समर्थन केले असते.

अजित पवारांचा दृष्टिकोन ग्रामीण रोजगार आणि सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग यांना चालना देण्यावर आधारित होता. ते म्हणाले असते की, "अर्थसंकल्पात ग्रामीण उद्योजकांना कर्जसुलभता, करसवलती, आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा लाभ मिळवून देणे गरजेचे आहे. रोजगारनिर्मिती आणि आत्मनिर्भरता हे धोरणांचे मुख्य आधार असले पाहिजेत." अजित पवारांसाठी अर्थसंकल्प म्हणजे निव्वळ आकडेवारी नव्हती; त्यात तरुण पिढीला संधी आणि कौशल्यविकास मिळणे हे महत्त्वाचे होते. त्यांनी म्हटले असते: "शासनाने कौशल्य प्रशिक्षण, स्टार्टअप्स, आणि विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रात लक्ष दिले पाहिजे. यामुळे ग्रामीण तरुणांनाही देशाच्या विकासात सामील करता येईल." त्यांचा विचार असायचा की अर्थसंकल्प संतुलित असावा. करयोग्य धोरणे, सार्वजनिक खर्चाचे विवेकपूर्ण नियोजन, आणि दीर्घकालीन विकासाच्या दृष्टीने धोरणात्मक गुंतवणूक. त्यांनी सांगितले असते की, "फक्त आकडे वाढवणे पुरेसे नाही; गुंतवणूक का केली जाते, कोणत्या क्षेत्रात ती परिणामकारक ठरते, हे स्पष्ट दिसावे." अजित पवारांसाठी अर्थसंकल्प हे सर्व स्तरांवरील लोकांसाठी समावेशी असणे आवश्यक होते. गरीब, मध्यमवर्गीय, महिला उद्योजक, शेतकरी आणि कामगार वर्गाला योग्य प्रकारे लाभ मिळणे हाच आर्थिक धोरणांचा मूळ उद्देश असावा.

## इराणच्या अयातुल्ला अली खामेनी यांचा थेट इशारा

# अमेरिकेने हल्ला केल्यास प्रादेशिक युद्ध पेटेल

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**तेहरान :** इराण–अमेरिका तणाव तीव्र होत असतानाच इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांनी रविवारी अत्यंत कठोर शब्दांत इशारा दिला. अमेरिकेने इराणवर कोणताही लष्करी हल्ला केल्यास मध्य पूर्वेत प्रादेशिक युद्ध भडकण्याची दाट शक्यता असून त्याचे परिणाम संपूर्ण प्रदेशावर होतील, असे त्यांनी स्पष्ट केले. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवर लष्करी कारवाईची धमकी दिल्यानंतर खामेनी यांचे हे विधान समोर आले आहे. वयाच्या ८६व्या वर्षी दिलेला हा इशारा आतापर्यंतचा त्यांचा सर्वात थेट आणि गंभीर इशारा मानला जात आहे.

इराणी सरकारी दूरचित्रवाणीने खामेनी यांचे वक्तव्य प्रसारित करताना सांगितले की, "जर युद्ध सुरू झाले, तर यावेळी ते केवळ मर्यादित राहणार नाही; ते प्रादेशिक युद्ध ठरेल, हे अमेरिकन लोकांनी लक्षात ठेवले पाहिजे." खामेनी पुढे म्हणाले, "इराण चिथावणीखोर नाही. आम्हाला कोणत्याही देशावर हल्ला करायचा नाही. मात्र, जो कोणी आमच्यावर हल्ला करेल किंवा त्रास देईल, त्याला इराणी राष्ट्र योग्य आणि ठोस प्रत्युत्तर देईल."

हे विधान अशा वेळी आले आहे, जेव्हा इराणमध्ये देशव्यापी निदर्शनांनंतर सुरक्षा दलांकडून कठोर कारवाई करण्यात आल्याच्या बातम्या येत आहेत. हजारो निदर्शकांना ताब्यात घेण्यात आल्याचे वृत्त असून, खामेनी यांनी याआधी या आंदोलनांची तुलना देशाच्या धार्मिक व्यवस्थेला आव्हान देणाऱ्या "बंडखोरी"शी केली होती. इराणमध्ये देशद्रोहाच्या आरोपाखाली मृत्युदंडाची तरतूद असल्याने, अटक करण्यात आलेल्या निदर्शकांबाबत आंतरराष्ट्रीय पातळीवर चिंता व्यक्त केली जात आहे. तेहरानमध्ये संभाव्य सामूहिक फाशीबाबतही भीती वाढली आहे.

दरम्यान, अमेरिकेने आपली लष्करी उपस्थिती वाढवली असून यूएसएस अब्राहम लिंकन ही विमानवाहू युद्धनौका आणि तिच्याशी संबंधित युद्धनौका अरबी समुद्रात तैनात करण्यात आल्या आहेत. इराणमध्ये निदर्शनांवर झालेल्या रक्तरंजित कारवाईनंतर ट्रम्प प्रशासनाने हा निर्णय घेतल्याचे सांगितले जाते. मात्र, ट्रम्प प्रत्यक्षात लष्करी बळाचा वापर करतील की नाही, याबाबत अद्याप स्पष्टता नाही. त्यांनी वारंवार सांगितले आहे की, इराणशी संवादाचा मार्ग खुला आहे आणि तेहरानचा अणुकार्यक्रम हा चर्चेचा मुख्य मुद्दा असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे.

तणावाच्या पार्श्वभूमीवर इराणने रविवारी आणि सोमवारी होर्मुझच्या सामुद्रधुनीत लष्करी सराव करण्याची घोषणा केली. पर्शियन आखाताच्या या अरुंद मार्गातून जगाच्या एकूण तेल व्यापाराचा मोठा हिस्सा जातो. या सरावांमुळे जागतिक ऊर्जा पुरवठ्यावर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. अमेरिकन लष्कराच्या सेंट्रल कमांडने यावर प्रतिक्रिया देताना, सरावांच्या नावाखाली अमेरिकन युद्धनौका, विमाने किंवा व्यावसायिक जहाजांना धमकावण्याचा अथवा अडथळा निर्माण करण्याचा कोणताही प्रयत्न सहन केला जाणार नाही, असा कडक इशारा दिला आहे.

# मुख्यमंत्री फडणवीसांचा प्रचार न करण्याचा निर्णय

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**मुंबई :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यंदाच्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक प्रचारात सहभागी न होण्याचा निर्णय घेतला आहे. या निवडणुकांमध्ये स्थानिक नेते आणि पदाधिकारी प्रचाराची जबाबदारी सांभाळणार असून, मुख्यमंत्री फडणवीस स्वतः कोणतीही प्रचारसभा घेणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

राज्यातील १२ जिल्हा परिषद आणि त्याअंतर्गत १२५ पंचायत समित्यांसाठी ७ फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे. त्यासाठी ५ फेब्रुवारीपर्यंत प्रचाराचा कालावधी देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस यांच्या सात दिवसांत २२ प्रचारसभा नियोजित होत्या. मात्र, अजित पवार यांच्या निधनामुळे त्यांनी सर्व सभा रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

दरम्यान, राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या तारखांमध्ये बदल केला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर राज्यात जाहीर करण्यात आलेल्या तीन दिवसांच्या दुखवट्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार ५ फेब्रुवारी रोजी होणारे मतदान आता ७ फेब्रुवारीला होणार असून, मतमोजणीची तारीख ९ फेब्रुवारी निश्चित करण्यात आली आहे.

# संपादकीय

## भविष्यातील विकासाचे चित्र मांडणारा अर्थसंकल्प

**केंद्र सरकारने पुन्हा एकदा भांडवली खर्चावर भर देणारा, पायाभूत सुविधांसाठी तरतूद करणारा, रोजगार निर्मितीला चालना देणारा अर्थसंकल्प सादर केला आहे. अर्थव्यवस्थेला अशा धोरणांमुळे चालना मिळत असला, तरी अखेरच्या घटकापर्यंत त्याचा लाभ पोहोचतो का, हा प्रश्न अनुत्तरित राहतो.**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेला ताजा अर्थसंकल्प 'भविष्यातील दृष्टी' आणि 'विकासाचा वेग' यांच्याभोवती आहे. आरोग्य, शिक्षण, पायाभूत सुविधा, उत्पादन क्षेत्र, डिजिटल अर्थव्यवस्था अशा प्रत्येक घटकाला स्पर्श करताना हा अर्थसंकल्प निव्वळ आकड्यांचा खेळ नसून तो एक राजकीय आणि आर्थिक विधान ठरतो. सरकारने यंदाच्या अर्थसंकल्पात भांडवली खर्चावर पुन्हा भर दिला आहे. पायाभूत सुविधांसाठी तब्बल बारा लाख कोटी रुपयांची तरतूद ही निश्चितच मोठी बाब आहे. रस्ते, रेल्वे, बंदरे, लॉजिस्टिक्स, शहरी पायाभूत सुविधा यामुळे रोजगारनिर्मिती होईल, अशी सरकारची भूमिका आहे. गेल्या दशकात या धोरणामुळे अर्थव्यवस्थेला काही प्रमाणात गती मिळाल्याचे नाकारता येणार नाही. मात्र या गुंतवणुकीचा थेट फायदा समाजाच्या खालच्या स्तरापर्यंत कितपत पोहोचतो, हा प्रश्न कायम आहे. कौशल्य विकास, स्टार्टअप्स, डिजिटल तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सेमीकंडक्टर उत्पादनावर दिलेला भर हे भविष्यातील अर्थव्यवस्थेचे संकेत देतात. भारत जागतिक उत्पादन साखळीत महत्त्वाचा घटक बनावा, ही महत्त्वाकांक्षा स्पष्ट दिसते. मात्र भारतातील तरुणांची मोठी लोकसंख्या आजही मूलभूत शिक्षण, दर्जेदार आरोग्य सुविधा आणि स्थिर रोजगाराच्या शोधात आहे. शिक्षण क्षेत्रासाठी केलेल्या तरतुदी कागदावर आकर्षक वाटतात. डिजिटल शिक्षण, संशोधन, नाविन्यपूर्ण अभ्यासक्रम यांचा उल्लेख आहे. पण सरकारी शाळांची अवस्था, शिक्षकांची कमतरता आणि उच्च शिक्षणातील वाढती फी या प्रश्नांवर ठोस उपाय दिसत नाहीत. ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेची भाषा करणाऱ्या देशात शिक्षण हे खर्चाचे नव्हे, तर गुंतवणुकीचे क्षेत्र मानले पाहिजे. त्यासाठी केवळ घोषणांपेक्षा संरचनात्मक सुधारणा आवश्यक आहेत. आरोग्य क्षेत्राबाबतही अशीच स्थिती आहे. विमा योजना, डिजिटल आरोग्य पायाभूत सुविधा, वैद्यकीय महाविद्यालयांची संख्या वाढवण्याचे आश्वासन दिले जाते. पण ग्रामीण आणि निमशहरी भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रांची दयनीय अवस्था, डॉक्टरांची कमतरता आणि खाजगी आरोग्यसेवेचा वाढता खर्च या वास्तवाशी अर्थसंकल्प भिडताना दिसत नाही. महामारीनंतर आरोग्य व्यवस्थेचे महत्त्व सर्वांना उमगले असतानाही, सार्वजनिक आरोग्यावरचा खर्च अजूनही मर्यादित आहे. महागाई आणि सामान्य नागरिक हा विषय मात्र पुन्हा एकदा बाजूला राहतो. इंधनावरील कर, अन्नधान्याच्या किंमती, शिक्षण आणि आरोग्याचा खर्च यामुळे मध्यमवर्ग आणि गरीब वर्ग दोघेही दबावाखाली आहेत. अर्थसंकल्पात थेट करसवलती किंवा महागाई कमी करण्यासाठी ठोस उपाय दिसत नाहीत. अर्थसंकल्पाचे खरे सामर्थ्य कुठे दिसत असेल, तर ते पायाभूत सुविधांमध्ये. कारण शेती, उद्योग, पर्यटन किंवा माहिती-तंत्रज्ञान या सर्व क्षेत्रांची वाढ अखेरीस रस्ते, रेल्वे, बंदरे, ऊर्जा आणि शहरी सोयीसुविधांवरच अवलंबून असते. २०२६–२७ च्या अर्थसंकल्पात भांडवली खर्चावर दिलेला भर हा केवळ आकड्यांचा खेळ नसून आर्थिक धोरणातील ठाम निवड आहे. गेल्या काही वर्षांपासून केंद्र सरकार पायाभूत सुविधांकडे खर्च म्हणून नव्हे, तर गुंतवणूक म्हणून पाहत आहे. यंदाचा अर्थसंकल्प हीच भूमिका पुढे नेतो. महामार्ग, द्रुतगती मार्ग, रेल्वे नेटवर्क, मालवाहतूक मार्गिका, बंदरे आणि नागरी वाहतूक व्यवस्थेसाठी करण्यात आलेली तरतूद ही उत्पादन खर्च कमी करणारी आहे. शेतमाल बाजारात पोहोचण्याचा वेळ कमी होतो, उद्योगांची लॉजिस्टिक साखळी मजबूत होते आणि पर्यटन क्षेत्राला आवश्यक असलेली सहज पोहोच निर्माण होते. रेल्वे आणि रस्ते क्षेत्रातील गुंतवणूक ही केवळ प्रवास सुलभ करण्यापुरती मर्यादित नाही. ती ग्रामीण अर्थव्यवस्थेला बाजाराशी जोडणारी आहे. शेतकऱ्यांच्या उत्पादनाला योग्य किंमत मिळावी, उद्योगांना वेळेत कच्चा माल मिळावा आणि तयार माल वेगाने पोहोचावा या तिन्हींची गुरुकिल्ली पायाभूत सुविधांमध्येच आहे. अर्थसंकल्पातील या तरतुदी त्यामुळे अप्रत्यक्षपणे कृषी आणि उत्पादन क्षेत्रालाच बळ देणाऱ्या ठरतात. हा अर्थसंकल्प एका विशिष्ट आर्थिक विचारसरणीचे प्रतिबिंब आहे. मोठी गुंतवणूक, खासगी क्षेत्रावर विश्वास, बाजाराभिमुख धोरणे आणि भविष्यातील तंत्रज्ञानावर लक्ष हे सारे जागतिक प्रवाहाशी सुसंगत आहे. मात्र भारतीय समाजाची रचना, विषमता आणि प्रचंड असंघटित क्षेत्र लक्षात घेता, विकास सर्वांना न्याय देईल का, हा प्रश्न पुन्हा उभा राहतो. एकूणात, हा अर्थसंकल्प दिशा दाखवतो, पण त्या दिशेने जाण्यासाठी आवश्यक सामाजिक आणि संस्थात्मक तयारी पुरेशी आहे का, याबद्दल शंका राहते. भविष्यातील भारताची स्वप्ने दाखवताना वर्तमानातील वास्तवाकडे दुर्लक्ष झाले, तर ती स्वप्ने केवळ पोस्टरपुरती मर्यादित राहण्याचा धोका असतो. अर्थसंकल्प म्हणजे केवळ आकड्यांची मांडणी नव्हे; तो समाजाला कोणत्या मार्गाने नेणार आहे, याचे प्रतिबिंब असतो. यंदाचा अर्थसंकल्प भविष्याकडे बोट दाखवतो, पण त्या भविष्यापर्यंत पोहोचण्यासाठी आवश्यक असलेली समतोल वाटचाल अजूनही प्रश्नांकितच आहे.

# संयम सुटला तर संकट ओढवणार!

**» जागतिक राजकारणात वाढते तणाव, शस्त्रस्पर्धा आणि आक्रमक राष्ट्रधोरणांमुळे आजचे जग अस्थिर वळणावर उभे आहे. संवाद आणि करार मागे पडत असताना संयम सुटण्याची लक्षणे स्पष्ट दिसत असून, त्याचे दूरगामी आणि गंभीर परिणाम होण्याची भीती वाढत आहे.**



जग आज अस्वस्थ आहे. केवळ युद्धांच्या बातम्यांमुळे नव्हे, तर त्या युद्धांमागे असलेल्या वृत्तीमुळे. गेल्या काही दशकांत जागतिक राजकारणात जे थोडेफार संतुलन निर्माण झाले होते, ते हळूहळू झिजत चालले आहे. संवाद, करार, संयम आणि परस्पर भीती या चार खांबांवर उभी असलेली आंतरराष्ट्रीय सुरक्षा रचना सध्या हादरलेली दिसते. या पार्श्वभूमीवर संयम सोडण्याची प्रवृत्ती अधिक धोकादायक ठरते आहे. शीतयुद्धानंतर जगाने थोडा उसासा टाकला होता. अमेरिका आणि रशिया यांच्यातील अण्वस्त्र नियंत्रण करारांमुळे किमान इतके तरी निश्चित झाले होते की महाविनाशाची शक्यता नियंत्रणात आहे. परंतु आता हेच करार संपण्याच्या मार्गावर आहेत किंवा त्यांना फारसे महत्त्व उरलेले नाही. सामरिक शस्त्रांवरील मर्यादा शिथिल होत आहेत आणि 'आपली ताकद दाखवण्याची' स्पर्धा पुन्हा एकदा डोके वर काढत आहे. रशिया-युक्रेन युद्धाने ही प्रक्रिया वेगाने पुढे ढकलली. युक्रेनच्या भूमीवर चाललेला संघर्ष हा दोन देशांपुरता मर्यादित नाही; तो अमेरिका, युरोप, नाटो आणि रशिया यांच्या व्यापक संघर्षाचे प्रतीक आहे. या युद्धामुळे केवळ मानवी हानीच झाली नाही, तर जागतिक विश्वासालाही मोठा धक्का बसला. युद्ध संपवण्यासाठी लागणारा संयम आणि राजनैतिक दूरदृष्टी दोन्ही बाजूंनी कमी पडताना दिसत आहेत. अमेरिकेच्या धोरणातही मोठा बदल जाणवतो. अण्वस्त्र नियंत्रण करारांपेक्षा संरक्षण व्यवस्था बळकट करण्यावर अधिक भर दिला जात आहे. क्षेपणास्त्र संरक्षण, नव्या पिढीची शस्त्रे आणि तांत्रिक वर्चस्व यावर विश्वास ठेवला जात आहे. परंतु इतिहास सांगतो की केवळ संरक्षणाची भावना ही दुसऱ्या बाजूला असुरक्षिततेची जाणीव करून देते. त्यातूनच अधिक आक्रमक शस्त्रस्पर्धेला चालना मिळते. रशियाही याला अपवाद नाही. नव्या प्रकारची हायपरसोनिक शस्त्रे, अण्वस्त्रांनी सुसज्ज पाणबुडी आणि दीर्घ पल्ल्याची क्षेपणास्त्रे यामुळे ते आपली ताकद अधोरेखित करत आहे. बाह्यतः संयमाचा सूर आळवला जात असला, तरी प्रत्यक्षात 'तयारी'वरच अधिक भर दिला जात आहे. ही तयारी शांततेसाठी आहे की संघर्षासाठी, हा प्रश्न अनुत्तरितच राहतो. युरोपही संभ्रमात आहे. दीर्घकाळ अमेरिकेच्या संरक्षण छत्राखाली राहिलेल्या युरोपला आता स्वतःच्या सुरक्षेची चिंता वाटू लागली आहे. नाटोचे भवितव्य, युरोपियन देशांची लष्करी स्वायत्तता आणि संरक्षण खर्च यावर चर्चा वाढली आहे. परंतु एकत्रित भूमिका न ठरल्यास हा गोंधळ अधिकच वाढणार आहे. या साऱ्या घडामोडींचा परिणाम केवळ राजकीय किंवा लष्करी पातळीवर मर्यादित नाही. जागतिक अर्थव्यवस्था, ऊर्जा पुरवठा, अन्नसुरक्षा आणि व्यापार यावरही त्याचे पडसाद उमटत आहेत. युद्ध आणि तणाव यांचा भार शेवटी सामान्य नागरिकांवरच पडतो. महागाई, बेरोजगारी आणि अस्थिरता हे त्याचे थेट परिणाम आहेत. अशा काळात संयमाचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. संयम म्हणजे कमजोरी नव्हे; तो विवेकाचा, जबाबदारीचा आणि दीर्घकालीन विचाराचा परिचायक आहे. करार, संवाद आणि परस्पर विश्वास हे कालबाह्य झाले आहेत, असे मानणे ही मोठी चूक ठरेल. उलट, अशाच काळात त्यांची गरज अधिक तीव्र असते. भारतासाठीही ही स्थिती महत्त्वाची आहे. जागतिक तणावाचा थेट परिणाम भारताच्या परराष्ट्र धोरणावर, संरक्षण नियोजनावर आणि अर्थव्यवस्थेवर होऊ शकतो. त्यामुळे कोणत्याही एका गटाच्या आंधळ्या पाठलागाऐवजी संतुलित, स्वायत्त आणि विवेकी भूमिका घेणे भारतासाठी आवश्यक ठरते. शांतता, संवाद आणि बहुपक्षीय सहकार्य यावर आधारित धोरण हीच भारताची खरी ताकद आहे. जग एका वळणावर उभे आहे. संयम टिकवला, तर संघर्ष टाळता येऊ शकतो. पण संयम सुटला, तर इतिहासाने वारंवार दाखवून दिल्याप्रमाणे, त्याची किंमत फार मोठी असते. युद्ध जिंकणारे क्वचित असतात; पण त्याची झळ बसणारे मात्र सर्वच असतात. त्यामुळे शक्तीपेक्षा विवेक, आणि आक्रमकतेपेक्षा संयम यालाच आजच्या जागतिक राजकारणात खरे महत्त्व द्यावे लागेल.

# सिग्नल यंत्रणेतील बॅटरी चोरणारी टोळी गजाआड

## वानवडी पोलिसांची कारवाई; ३४ बॅटरी जप्त, पाच गुन्हे उघड

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** शहरातील प्रमुख चौकांमधील वाहतूक सिग्नल यंत्रणेच्या ट्रॅफिक कंट्रोल बॉक्समधून बॅटऱ्या चोरणाऱ्या टोळीला वानवडी पोलिसांनी अटक करून मोठा गुन्हा उघडकीस आणला आहे. या टोळीने एकूण ३४ बॅटऱ्या चोरल्याचे तपासात स्पष्ट झाले असून, आतापर्यंत पाच गुन्हे उघडकीस आले आहेत. या कारवाईमुळे शहरातील सिग्नल यंत्रणेच्या सुरक्षेबाबत निर्माण झालेल्या चिंतेला काहीसा दिलासा मिळाला आहे.

पुणे स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत शहरातील सिग्नल यंत्रणा अद्ययावत करण्यात आली आहे. वीजपुरवठा खंडित झाल्यानंतरही वाहतूक सुरळीत राहावी, यासाठी सिग्नल यंत्रणेत बॅटऱ्यांची सोय करण्यात आली आहे. या बॅटऱ्यांना सेन्सर बसविण्यात आले असल्याने बॅटरी चोरीला गेल्याचे तातडीने लक्षात येते. पुणे-सोलापूर रस्त्यावरील एएफएमसी चौक, रेसकोर्स चौक आणि काळूबाई मंदिर चौक येथील सिग्नल यंत्रणांमधील सहा बॅटऱ्या चोरीला गेल्याची तक्रार संबंधित खासगी कंपनीने २७ जानेवारी रोजी वानवडी पोलिसांकडे दाखल केली होती.

तक्रारीनंतर वानवडी पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. सीसीटीव्ही चित्रीकरणाची पाहणी करत असताना पोलिसांना रिक्षातून चोरी करत असल्याची माहिती मिळाली. पोलीस कर्मचारी आशिष कांबळे आणि बालाजी वाघमारे यांना मिळालेल्या माहितीच्या आधारे रिक्षाचालक दीपक कांबळे आणि त्याचे साथीदार बॅटरी विक्रीच्या तयारीत असल्याचे समोर आले. त्यानंतर पोलिसांनी सापळा रचून चौघांना अटक केली.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये दीपक अमोल कांबळे (वय ३२, रा. रामनगर, रामटेकडी, हडपसर), चाँद उस्मान शेख (वय २८, रा. रामनगर, रामटेकडी, हडपसर), विकास ऊर्फ टकल्या विजय माने (वय ३६, रा. अरोरा टॉवर्सजवळील पदपथ, लष्कर) आणि अली मुल्ला शेख (वय २७, रा. भाग्योदयनगर, कोंढवा) यांचा समावेश आहे. आरोपींकडून कटावणी, सुमारे ६८ हजार रुपये किमतीच्या ३४ बॅटऱ्या तसेच चोरीसाठी वापरण्यात आलेली रिक्षा जप्त करण्यात आली आहे.

# पुणे पोलीस दलात मोठ्या भरतीचे संकेत

## शहराचा वाढता भार कमी करण्यासाठी लवकरच भरती प्रक्रिया

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** वेगाने विस्तारत असलेले पुणे शहर आणि सातत्याने वाढत जाणारी लोकसंख्या यामुळे पुणे पोलीस दलावर मोठ्या प्रमाणात कामाचा ताण निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर पुणे पोलीस दलातील रिक्त पदे भरण्यासाठी बहुप्रतिक्षित पोलीस भरती प्रक्रिया (Police Bharati) लवकरच राबवली जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे खाकी वर्दीचे स्वप्न पाहणाऱ्या हजारो तरुणांना मोठा दिलासा मिळणार आहे.

सध्या पुणे शहरात कायदा-सुव्यवस्था सुरळीत राखण्यासाठी अंदाजे २० ते २१ हजार पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. मात्र प्रत्यक्षात केवळ सुमारे १० हजार कर्मचारी कार्यरत असल्याने मनुष्यबळाची तीव्र कमतरता जाणवत आहे. परिणामी अनेक पोलीस कर्मचाऱ्यांना सलग २४ तास ड्युटी करावी लागत असून त्याचा त्यांच्या आरोग्यावर आणि कौटुंबिक जीवनावरही परिणाम होत आहे. त्यातच मागील वर्षात सुरू झालेल्या पाच नव्या पोलीस ठाण्यांमुळे ही समस्या अधिकच गंभीर झाली आहे. या परिस्थितीत भरती प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, पोलीस भरतीसाठीची मैदानी शारीरिक चाचणी १० ते १५ फेब्रुवारीदरम्यान सुरू होण्याची शक्यता आहे.

# पुण्यात नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी गतिरोधक पुन्हा बसवणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुणे ग्रॅण्ड टूर (Pune Grand Tour) या आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेसाठी शहरातील अनेक प्रमुख रस्त्यांचे स्वरूप तात्पुरते बदलण्यात आले होते. स्पर्धेदरम्यान सायकलस्वारांना अडथळामुक्त आणि गुळगुळीत मार्ग मिळावा यासाठी महापालिकेने गतिरोधक काढून टाकण्यासह मोठ्या प्रमाणावर रस्ते दुरुस्ती केली होती. मात्र स्पर्धा संपल्यानंतर या रस्त्यांवर वाहनांचा वेग प्रचंड वाढल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे पुणे महानगरपालिकेने काढून टाकलेले गतिरोधक पुन्हा बसवण्याचा निर्णय घेतला आहे.

महापालिकेने या स्पर्धेसाठी सुमारे ७५ किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची दुरुस्ती केली होती. यामध्ये चेंबर समपातळीवर आणणे, खड्डे बुजवणे आणि गतिरोधक हटवणे यांचा समावेश होता. या सुधारणा स्पर्धेच्या दृष्टीने उपयुक्त ठरल्या, मात्र त्यानंतर गणेशखिंड रस्ता, पाषाण रस्ता, सेनापती बापट रस्ता यांसारख्या वर्दळीच्या मार्गांवर वाहनचालकांकडून अतिवेगाने वाहन चालवली जात असल्याचे निदर्शनास आले. यामुळे पादचारी, ज्येष्ठ नागरिक, शालेय विद्यार्थी आणि दुचाकीस्वारांना रस्ता ओलांडताना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. संभाव्य अपघातांची भीती व्यक्त होत असताना नागरिकांकडून महापालिकेकडे तक्रारी वाढल्या होत्या.

# पिंपरी-चिंचवड महापालिकेत भाजपाची ताकद वाढली

## ८४ नगरसेवकांचा स्वतंत्र भाजप गट स्थापन; प्रशांत शितोळे गटनेते

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ मध्ये भारतीय जनता पार्टीने मोठे यश मिळवत एकूण ८४ नगरसेवक निवडून आणले आहेत. या पार्श्वभूमीवर दि. ३० जानेवारी २०२६ रोजी सर्व निवडून आलेल्या भाजप नगरसेवकांची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत सोबत जोडलेल्या यादीनुसार उपस्थित नगरसेवकांनी एकत्रितपणे भारतीय जनता पार्टी गटास मान्यता देत एकमताने ठराव मंजूर केला.

या बैठकीत 'पिंपरी-चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी गट' अशी अधिकृत गटस्थापना करण्याचा ठरावही सर्वानुमते संमत करण्यात आला. महापालिकेतील प्रशासन व राजकीय प्रक्रियेत प्रभावी भूमिका बजावण्यासाठी हा गट स्थापन करण्यात आल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. तसेच प्रभाग क्रमांक ३२-ड मधून निवडून आलेले नगरसेवक श्री. प्रशांत कृष्णराव शितोळे यांची भाजप गटनेतेपदी एकमताने निवड करण्यात आली. त्यांच्या नेतृत्वाखाली महापालिकेत विकासाभिमुख आणि लोकहिताच्या निर्णयांसाठी भाजप गट सक्रिय राहील, असा विश्वास यावेळी नगरसेवकांनी व्यक्त केला. या गटाची अधिकृत नोंदणी करण्याबाबत मा. विभागीय आयुक्त, पुणे तसेच मा. आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांच्याकडे आवश्यक कार्यवाही करण्याचा ठरावही बैठकीत घेण्यात आला. पिंपरी-चिंचवड महापालिकेतील भाजपाची संघटनात्मक ताकद अधिक मजबूत झाली. आगामी काळात प्रशासनावर भाजपाचा ठसा अधिक ठळकपणे उमटेल, अशी चर्चा सुरू आहे.




### महापौरपदही चिंचवडकडे?

● गटनेता चिंचवड विधानसभा मतदारसंघातील केल्यानंतर आता महापौरपदही याच मतदारसंघात राहण्याची शक्यता आहे. भाजपचे शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, राहुल कलाटे, रवी लांडगे, नितीन लांडगे हे महापौरपदासाठी इच्छुक आहेत. चिंचवड मतदारसंघाकडे महापौरपद ठेवल्यास शत्रुघ्न काटे आणि राहुल कलाटे यांच्यात महापौरपदासाठी चुरस असणार आहे. महापौर, उपमहापौरपदासाठी सोमवारी दुपारी तीन ते पाच या वेळेत उमेदवारी अर्ज दाखल करण्यात येणार आहेत. स्थायी समितीचे अध्यक्षपद भोसरी मतदारसंघाकडे राहण्याची शक्यता आहे.

# संविधानाला अभिप्रेत नसलेली भाषा-रंग लादण्याची स्वप्ने धोकादायक

## संविधान रक्षणासाठी एकत्रित लढ्याची गरज – अन्वर राजन

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** पुणे : राज्यात काही दिवसांपूर्वी मराठी भाषेवर हिंदी लादण्याचा प्रयत्न झाल्याचा वाद सुरू असतानाच, आता राष्ट्रध्वजाच्या रंगांबाबतही विपरीत भूमिका मांडली जात आहे. ही बाब भारतीय संविधानाला अभिप्रेत नसून, अशा स्वप्न पाहणाऱ्यांना ठामपणे विरोध करण्याची गरज आहे, असे परखड मत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अन्वर राजन यांनी व्यक्त केले. संविधानाने दिलेल्या मूल्यांचे रक्षण करण्यासाठी सर्व विचारवंत, सामाजिक संघटना आणि नागरिकांनी एकत्र येऊन दीर्घकालीन लढा उभारला पाहिजे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

लोकशाही उत्सव समिती आणि मिळून साऱ्याजणी मासिकाच्या वतीने आयोजित विद्या बाळ स्मृती जीवन गौरव पुरस्कार वितरण सोहळ्यात राजन बोलत होते. एस. एम. जोशी फाऊंडेशनच्या मोंडकर सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात ज्येष्ठ लेखिका उर्मिला पवार यांना डॉ. गिताली वि. म. यांच्या हस्ते जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. याच कार्यक्रमात ॲड. निशा शिवूरकर लिखित 'गोष्ट तिरंगा ध्वजाची' या पुस्तकाचे प्रकाशनही झाले. अन्वर राजन म्हणाले, "भारतीय संविधानात सर्व धर्म, भाषा, रंग आणि संस्कृती यांच्या संरक्षणाची स्पष्ट हमी दिली आहे. राष्ट्रध्वजातील तीन रंग हे केवळ प्रतीक नसून, देशातील विविधता, समता आणि बंधुतेचे दर्शन घडवतात. भाषा, धर्म, पंथ, वर्ण आणि संस्कृती यांचा सन्मान राखण्याचा संदेश तिरंग्यातून मिळतो. तरीही काही लोक इतिहासाची तोडमोड करून खोटी मते पसरवत आहेत. त्यामुळे बालकांपासून तरुणांपर्यंत चुकीचा इतिहास पोहोचवला जात आहे, ही अत्यंत गंभीर बाब आहे."

> देशात सर्वधर्म समभाव, स्त्री पुरूष समानता असे गौरवाने सांगितले जात असले, तरी वर्ण आणि जातीचे कप्पे तळागाळात रुजले आहेत. जात वर्ग लिंग भाव समूळ नष्ट करून लोकशाही सक्षम रहावी म्हणून समूळ जातीअंत करणे अत्यंत महत्वाचे आहे. असे झाल्यास देश सार्वभौम असल्याचे म्हणता येईल.
>
> —उर्मिला पवार, ज्येष्ठ लेखिका

ते पुढे म्हणाले, "आपल्याकडे इतिहासाचे पुरावे उपलब्ध असतानाही खोटे कथानक रचण्याचे कौशल्य प्राप्त झालेला मोठा वर्ग निर्माण झाला आहे. देशाची प्रतिके ही लोकांना जोडण्यासाठी असतात, नाकारण्यासाठी नाहीत. मातृभाषा, सांस्कृतिक ओळख आणि रंग जपण्याचा अधिकार संविधान देतो. त्यामुळे विभाजन करणाऱ्या विचारांविरुद्ध वैचारिक, सामाजिक आणि लोकशाही मार्गाने लढा देणे अपरिहार्य आहे."

यावेळी पुरस्कार स्वीकारताना उर्मिला पवार म्हणाल्या, "आपण सर्वधर्म समभाव, स्त्री-पुरुष समानता यांचा अभिमानाने उल्लेख करतो; मात्र प्रत्यक्षात जात, वर्ग आणि लिंगभेद तळागाळात अजूनही खोलवर रुजले आहेत. लोकशाही सक्षम आणि सार्वभौम ठेवायची असेल, तर जातीय आणि सामाजिक विषमता समूळ नष्ट करणे अत्यंत आवश्यक आहे."

# मदतीच्या नावाखाली लाच मागणारा पोलीस हवालदार एसीबीच्या जाळ्यात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** खून प्रकरणात अटक केलेल्या मुलाला लवकर जामीन मिळवून देण्याचे आमिष दाखवत तसेच न्यायालयात आरोपपत्र दाखल करण्यासाठी लाच मागणाऱ्या पोलीस हवालदाराला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) अटक केली आहे. ही कारवाई बारामती तालुक्यातील वडगाव निंबाळकर पोलीस ठाण्याच्या हद्दीत करण्यात आली.

या प्रकरणी पोलीस हवालदार रमेश लक्ष्मण नागटिळक (वय ४२, रा. शारदानगर, माळेगाव, बारामती) याला अटक करण्यात आली असून, त्याच्याविरुद्ध वडगाव निंबाळकर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका ४६ वर्षीय महिलेने एसीबीकडे तक्रार दाखल केली होती. तक्रारदार महिलेच्या मुलावर खुनाचा गुन्हा दाखल असून, तो सध्या न्यायालयीन कोठडीत आहे. या प्रकरणाच्या तपासासाठी करंजेपुल चौकीत नियुक्त असलेला हवालदार नागटिळक याने जामीन मिळवून देण्यास मदत करतो, तसेच आरोपपत्र दाखल करण्यासाठी चौकीतील एका उपनिरीक्षकासह ३० हजार रुपयांची लाच मागितल्याचा आरोप करण्यात आला होता. तक्रारीनंतर एसीबीने पडताळणी केली असता, नागटिळक याने तडजोडीत २५ हजार रुपयांची लाच मागितल्याचे निष्पन्न झाले. मात्र, उपनिरीक्षकाचा या मागणीत सहभाग नसल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर एसीबीने सापळा रचत नागटिळक याला अटक केली. पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अजित पाटील व अर्जुन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अविनाश घरबुडे आणि पथकाने ही कारवाई केली.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### जिप. निवडणुकीसाठी मतदान यंत्रांची संख्या अंतिम

**पुणे :** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी उमेदवारांची निश्चिती झाल्यानंतर जिल्हा प्रशासनाने मतदान यंत्रे आणि कंट्रोल युनिटची अंतिम संख्या जाहीर केली आहे. त्यानुसार ३ हजार ६९३ मतदान यंत्रे आणि ३ हजार ६०५ कंट्रोल युनिट मतदान केंद्रांवर वापरण्यात येणार आहेत. १४६ गणांपैकी केवळ तीन गणांमध्ये दोन मतदान यंत्रांची आवश्यकता भासणार आहे. जिल्हा परिषद निवडणुकीसाठी ७३ गटांमध्ये २९९ उमेदवार तर पंचायत समितीच्या १४६ गणांसाठी ५२८ उमेदवार रिंगणात आहेत. अर्ज माघारीनंतर लढतींचे चित्र स्पष्ट झाले असून प्रशासनाची तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली आहे.

### निवडणुकीसाठी मतदान यंत्रांची संख्या अंतिम

**पुणे :** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी उमेदवारांची निश्चिती झाल्यानंतर जिल्हा प्रशासनाने मतदान यंत्रे आणि कंट्रोल युनिटची अंतिम संख्या जाहीर केली आहे. त्यानुसार ३ हजार ६९३ मतदान यंत्रे आणि ३ हजार ६०५ कंट्रोल युनिट मतदान केंद्रांवर वापरण्यात येणार आहेत. १४६ गणांपैकी केवळ तीन गणांमध्ये दोन मतदान यंत्रांची आवश्यकता भासणार आहे. जिल्हा परिषद निवडणुकीसाठी ७३ गटांमध्ये २९९ उमेदवार तर पंचायत समितीच्या १४६ गणांसाठी ५२८ उमेदवार रिंगणात आहेत.

### फेब्रुवारीसाठी साखरेचा कोटा जाहीर

**पुणे :** केंद्र सरकारने फेब्रुवारी महिन्यासाठी २२.५० लाख मेट्रिक टन साखरेचा कोटा जाहीर केला आहे. मागणीच्या तुलनेत कोटा कमी असल्याने कारखान्यांवरील साखरेच्या निविदा क्विंटलमागे १०० रुपयांनी वाढून ३,६५० रुपयांवर पोहोचल्या आहेत. घाऊक बाजारात एस-३० ग्रेड साखरेचे दरही ५० ते १०० रुपयांनी वाढून प्रतिक्विंटल ४ हजार रुपयांवर गेले आहेत. बाजारातील प्रत्यक्ष मागणी सध्या मंद असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

---

**भंडारा व पूजेच्या साहित्याच्या खरेदीवरून वाद बळावला; पवित्र देवस्थानाच्या परिसरात घडलेल्या घटनेमुळे सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह**

# जेजुरी गडावर किरकोळ वादातून भाविकांवर काठ्यांनी हल्ला!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जेजुरी :** अखंड महाराष्ट्राचे कुलदैवत श्री खंडोबा महाराजांचे पवित्र तीर्थक्षेत्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जेजुरी गडावर आज एक धक्कादायक आणि संतापजनक घटना घडली. भक्ती, श्रद्धा आणि "येळकोट येळकोट"च्या जयघोषाने निनादणाऱ्या या पवित्र स्थळी किरकोळ वादातून थेट काठ्यांची हाणामारी झाल्याने भाविकांमध्ये तीव्र अस्वस्थता निर्माण झाली आहे. या घटनेमुळे जेजुरीसारख्या धार्मिक स्थळाची प्रतिमा मलीन झाल्याची भावना अनेक भाविकांनी व्यक्त केली आहे.



प्राथमिक माहितीनुसार, जेजुरी गडाच्या पायथ्याशी असलेल्या एका दुकानावर भंडारा आणि पूजेचे साहित्य खरेदी करताना भाविक आणि दुकानदार यांच्यात वाद झाला. दर आणि साहित्याच्या गुणवत्तेवरून सुरू झालेला हा वाद सुरुवातीला शब्दयुद्धापुरताच मर्यादित होता. मात्र, काही क्षणांतच परिस्थिती चिघळत गेली आणि हा वाद थेट हातघाईत रूपांतरित झाला. संतप्त दुकानदार आणि त्यांच्या काही साथीदारांनी भाविकांवर काठ्यांनी हल्ला केल्याचा आरोप प्रत्यक्षदर्शींनी केला आहे.

या अचानक झालेल्या हिंसाचारामुळे देवदर्शनासाठी आलेल्या भाविकांमध्ये प्रचंड गोंधळ उडाला. विशेषतः महिला भाविक आणि लहान मुले या प्रकारामुळे घाबरून सैरावैरा पळताना दिसून आली. काही काळासाठी संपूर्ण परिसरात भीतीचे आणि तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. अनेक भाविकांनी आपले दर्शन अर्धवट सोडून सुरक्षित ठिकाणी जाणे पसंत केले.

या घटनेचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत आहे. व्हिडीओमध्ये काही जण हातात काठ्या आणि दांडके घेऊन एकमेकांवर हल्ला करताना स्पष्टपणे दिसत आहेत. पवित्र देवस्थानाच्या परिसरात उघडपणे झालेली ही मारहाण पाहून नेटकऱ्यांनीही संताप व्यक्त केला असून, प्रशासन आणि देवस्थान व्यवस्थापनाच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

**जेजुरीतील वातावरण कधी पुर्ववत होईल...**

● जेजुरी हे केवळ एक धार्मिक स्थळ नसून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक ओळखीचा महत्त्वाचा भाग आहे. लाखो भाविक श्रद्धेने येथे येत असतात. अशा ठिकाणी भाविकांची सुरक्षितता, शिस्त आणि शांतता अबाधित ठेवणे ही प्रशासन, पोलीस आणि देवस्थान व्यवस्थापनाची सामूहिक जबाबदारी आहे. या घटनेनंतर भाविकांकडून ठोस आणि कठोर उपाययोजना राबविण्याची जोरदार मागणी होत असून, जेजुरीतील पवित्र वातावरण पुन्हा पूर्ववत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

घटनेची माहिती मिळताच जेजुरी पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. पोलिसांच्या हस्तक्षेपानंतर वाद आवरला गेला असला, तरी काही काळ तणाव कायम होता. या प्रकरणी संबंधित व्यक्तींची चौकशी सुरू असून, दोषींवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, अशी माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. दरम्यान, जेजुरी देवस्थान समितीने या प्रकाराचा तीव्र निषेध केला आहे. भाविकांना त्रास देणाऱ्या आणि देवस्थानाच्या पवित्रतेला धक्का लावणाऱ्या दुकानदारांवर कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच गरज भासल्यास संबंधित दुकानांचे परवाने रद्द करण्यात यावेत, अशी मागणी समितीने केली आहे. भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी देवस्थान परिसरात सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्याची गरज असल्याचेही समितीने स्पष्ट केले आहे.

---

# आंबेगाव 'सुपर २३' निवड परीक्षा यशस्वी

**जिल्हा परिषद शाळांतील सहावी-सातवीच्या १,२१९ विद्यार्थ्यांचा सहभाग**

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** पंचायत समिती आंबेगाव शिक्षण विभाग आणि आयुका वेधशाळा, गिरवली यांच्या संयुक्त विद्यमाने आंबेगाव विकास गटातील जिल्हा परिषद शाळांमधील इयत्ता सहावी व सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी "आंबेगाव सुपर २३" या निवड परीक्षेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. गटशिक्षणाधिकारी रुपाली धोका यांच्या कल्पक संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला असून, तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात तो एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.



महाराष्ट्र राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे माजी पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या संकल्पनेतून सुरू असलेल्या इस्रो-नासा निवड चाचणीच्या धर्तीवर हा उपक्रम राबविण्यात आला. आंबेगाव विकास गटातील ४३ पूर्ण प्राथमिक जिल्हा परिषद शाळांमध्ये या परीक्षेची अंमलबजावणी करण्यात आली. ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांनाही आधुनिक विज्ञान, अंतराळ संशोधन व स्पर्धा परीक्षांच्या विश्वाशी जोडण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे.

या परीक्षेसाठी तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमधील इयत्ता सहावीचे ६१६ आणि इयत्ता सातवीचे ६०३ असे एकूण १,२१९ विद्यार्थी सहभागी झाले. परीक्षा तालुक्यातील १५ केंद्रांवर घेण्यात आली होती. यासाठी १५ केंद्र संचालक आणि ७५ पर्यवेक्षकांची नियुक्ती करण्यात आली होती. परीक्षा अत्यंत शिस्तबद्ध, पारदर्शक आणि निकोप वातावरणात पार पडली.

"आंबेगाव सुपर २३" या उपक्रमाचा मुख्य उद्देश तालुक्यातील गुणवंत विद्यार्थ्यांची ओळख पटवणे, विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे, स्पर्धा परीक्षांबाबत गोडी निर्माण करणे तसेच कार्यशाळा व सेमिनारच्या माध्यमातून त्यांचे बौद्धिक मार्गदर्शन करणे हा आहे. या परीक्षेतून निवड झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात येणार असून, त्यांच्या शैक्षणिक व वैज्ञानिक सहलींचे आयोजन करण्याचेही नियोजन आहे. या उपक्रमाचे संपूर्ण नियोजन पारदर्शक पद्धतीने झाले असून, शिक्षक, विद्यार्थी व पालकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणारा आणि त्यांना स्पर्धेच्या मुख्य प्रवाहात आणणारा हा उपक्रम असल्याचे मत शिक्षणतज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

---

# धामणीची यात्रा भक्तिरसात न्हाऊन निघाली

**श्री म्हाळसाकांत खंडेरायाच्या दर्शनासाठी हजारोंची गर्दी**

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** अहिल्यानगर, नाशिक व मुंबई जिल्ह्यातील भाविकांचे श्रद्धास्थान व कुलदैवत असलेल्या धामणी (ता. आंबेगाव) येथील श्रीक्षेत्र श्री म्हाळसाकांत खंडेरायाची माही पुनवेची यात्रा रविवारी भक्तिभावात मोठ्या उत्साहात पार पडली. "सदानंदाचा येळकोट, येळकोट-येळकोट जयमल्हार" या जयघोषात हजारो भाविकांनी खंडोबाचे दर्शन घेतले. भंडारा-खोबऱ्याची उधळण, गोंधळ-जागरण, पारंपरिक वाद्यांचा निनाद आणि भक्तीमय वातावरणाने संपूर्ण धामणी नगरी भक्तिरसात न्हाऊन निघाली होती.





खेड, आंबेगाव, जुन्नर, पारनेर, सिन्नर, संगमनेर, हवेली, शिरूर आदी तालुक्यांसह पुणे, पिंपरी-चिंचवड, मुंबई, नवी मुंबई येथून मोठ्या संख्येने भाविक यात्रेसाठी दाखल झाले होते. पहाटे मुख्य मंदिरातील स्वयंभू सप्तशिवलिंगावर रुद्राभिषेक व दुग्धाभिषेक करण्यात आला. देवस्थानचे मानकरी सेवेकरी भगत, तांबे, वाघे मंडळींच्या हस्ते सप्तशिवलिंगावर पंचधातूचे खंडोबा, म्हाळसाई व बाणाई यांच्या लोभस मुखवट्यांची प्रतिष्ठापना करून वस्त्रालंकार चढविण्यात आले. उत्तरमुखी खंडोबाची बहीण जोगेश्वरीच्या मूर्तीला देखील वस्त्रालंकार घालण्यात आले.

त्यानंतर देवस्थानचे सेवेकरी दादाभाऊ भगत, सुभाष तांबे, प्रभाकर भगत, धोंडीबा भगत, ज्ञानेश्वर भगत, शांताराम भगत, नामदेव भगत, पांडुरंग भगत, माऊली वाघे, दिनेश जाधव, अनिरुद्ध वाळुंज, बाळकृष्ण साळगट आदींच्या उपस्थितीत खंडोबाला पुरणपोळीचा नैवेद्य अर्पण करून पारंपरिक पूजा व महाआरती संपन्न झाली. महाआरतीनंतर मंदिर दर्शनासाठी खुले करण्यात आले. हजारो भाविकांनी रांगेत उभे राहून शांततेत दर्शन घेतले. यावेळी महिला भाविकांची उपस्थिती लक्षणीय होती.

मंदिर व परिसर आळे-पाडळी (ता. पारनेर) येथील थोरात बंधूंच्या सौजन्याने आकर्षक विद्युत रोषणाईने उजळून निघाला होता. गाभाऱ्यात व मंदिराभोवती फुलांची देखणी सजावट करण्यात आली होती. भाविकांकडून नवसपूर्तीसाठी गोंधळ-जागरण, तळी-भंडाऱ्याची उधळण सुरू होती. यात्रेच्या घाटातून नवसाचे बैलगाडे धावले. धामणीच्या खंडोबा देवाचा बैलगाडा शर्यतीचा घाट जिल्ह्यात प्रसिद्ध असून भाविकांनी या शर्यतींचा मनमुराद आनंद लुटला. यात्रेत जिलेबी, भजी, शेव-चिवडा, शेव-रेवडीचा खास आस्वाद भाविकांनी घेतला. लहान मुलांनी पाळण्यात बसण्याचा आनंद लुटला, तर शेतकऱ्यांनी शेतीसाठी लागणारी अवजारे खरेदी केली. चाकरमान्यांनी कुटुंबीय व मित्रमंडळीसह यात्रेला हजेरी लावून उत्सवाचा आनंद द्विगुणित केला.

यात्रेनिमित्त उपविभागीय पोलीस अधीक्षक अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पारगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नेताजी गंधारे यांच्या नेतृत्वाखाली चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. दंगल नियंत्रण पथक सज्ज ठेवण्यात आले असून दोन दिवसांसाठी सुमारे ५० पोलीस कर्मचारी तैनात होते. देवस्थान, सेवेकरी, ग्रामस्थ, यात्रा कमेटी, विविध संस्थांचे पदाधिकारी व तरुण मंडळाच्या कार्यकर्त्यांनी व्यवस्था उत्तम प्रकारे पाहिली.

---

# रांजणगाव गणपती येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली

**शिरुर तालुक्याच्या विकासाचा धुरा सांभाळणारे पुरोगामी नेतृत्व हरपल्याची भावना शोकसभेत व्यक्त**

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**रांजणगाव गणपती :** सर्वांगीण विकासकामांची गंगा खेडोपाड्यातील गोरगरीबांच्या दारापर्यंत पोहोचवणारे आणि महाराष्ट्राला पुरोगामी विचारांचा वारसा देणारे नेतृत्व आपण गमावले आहे, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे नेते स्वर्गीय अजित पवार यांना रांजणगाव गणपती येथे श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.




रांजणगाव गणपती (ता. शिरुर) येथील राजमुद्रा निवासस्थानाशेजारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानिमित्त शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. या शोकसभेला विविध क्षेत्रातील मान्यवर, लोकप्रतिनिधी, पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी अजितदादांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव करताना त्यांच्या आठवणींना उजाळा देण्यात आला. भावना व्यक्त करताना अनेकांच्या डोळ्यांतून अश्रू अनावर झाले. स्व. अजितदादांचा शिरुर तालुक्याच्या सर्वांगीण विकासात मोलाचा वाटा राहिला आहे. त्यांच्या दूरदृष्टीमुळे अनेक विकासकामे मार्गी लागली. त्यांनी आपल्यावर सोपवलेली जबाबदारी आपण सर्वांनी प्रामाणिकपणे पार पाडली पाहिजे. तसेच त्यांच्या कुटुंबियांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे हीच खरी श्रद्धांजली ठरेल, अशी भावना राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र कोरेकर यांनी व्यक्त केली. दादांसारखा धुरंधर नेता पुन्हा होणे नाही, असेही त्यांनी नमूद केले. आंबेगाव-शिरुर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष मानसिंग पाचुंदकर यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, सर्वसामान्य कुटुंबातील कार्यकर्त्याला जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या अध्यक्षपदाची संधी स्व. अजित पवार आणि माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्यामुळे मिळाली. येत्या ७ तारखेला जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक प्रचारार्थ होणाऱ्या सभेला अजितदादा येणार असल्याचे त्यांनी सांगितले होते, मात्र ते स्वप्न अपूर्ण राहिले.

---

### कांद्याची आवक वाढली; दर स्थिर राहण्याचा अंदाज

**पुणे :** लाल हळीव कांद्याचा हंगाम सुरू असतानाच येत्या पंधरा दिवसांत गरवी कांद्याचा हंगामही सुरू होणार असल्याने बाजारात कांद्याची मोठ्या प्रमाणात आवक होण्याची शक्यता आहे. मागणीच्या तुलनेत पुरवठा अधिक राहणार असल्याने पुढील काही दिवस कांद्याचे दर सध्याच्या पातळीवरच स्थिर राहतील, असा अंदाज व्यापारी रितेश पोमण यांनी व्यक्त केला. सध्या पोषक हवामानामुळे कांद्याचे उत्पादन वाढले असून शेतकऱ्यांकडे साठा शिल्लक आहे. त्यातच नवीन हंगाम सुरू होत असल्याने दरवाढीची शक्यता कमी आहे. दक्षिण भारतासह मध्य प्रदेश, राजस्थान, गुजरात व उत्तर प्रदेशातही कांद्याचे उत्पादन चांगले झाल्याने बाहेरील मागणी कमी आहे. निर्यात मर्यादित असल्याने दरात आणखी घट होण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

---

# गावठी हातभट्टी दारू विक्रीला आळा : महिला विक्रेत्यावर एमपीडीए अंतर्गत एक वर्षाची स्थानबद्ध कारवाई

**सार्वजनिक सुव्यवस्था व नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने कठोर पाऊल**

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**यवत :** यवत पोलीस स्टेशन हद्दीतील नांदूर-खामगाव परिसरात बेकायदेशीर गावठी हातभट्टीची दारू काढून विक्री करणाऱ्या महिलेविरोधात महाराष्ट्र प्रतिबंधक कायदा (एम.पी.डी.ए.) अंतर्गत एक वर्षासाठी स्थानबद्धतेची कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईमुळे परिसरातील अवैध दारूविक्री व त्यातून उद्भवणाऱ्या गुन्हेगारी कृत्यांना आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



नांदूर (ता. दौंड, जि. पुणे) येथील पवार अँग्रोसमोरील वनखात्याच्या जागेत, ओढ्याच्या कडेला लैली मच्छिंद्र गुडदावत (रा. नांदूर) ही महिला बेकायदेशीररीत्या गावठी हातभट्टीची दारू गाळून विक्री करत असल्याचे वारंवार निदर्शनास आले होते. यवत पोलीस ठाण्यात तिच्याविरोधात यापूर्वी सहा गुन्हे दाखल असतानाही तिने अवैध व्यवसाय सुरूच ठेवला होता. त्यामुळे परिसरातील शांतता भंग होत असून नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होत असल्याचे पोलिसांच्या तपासात स्पष्ट झाले. सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच गुन्हेगारी प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी प्रभावी प्रतिबंधक कारवाई करणे अत्यावश्यक असल्याने, महाराष्ट्र हातभट्टीवाले व औषधीद्रव्यविषयक विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबतच्या कायद्यानुसार ही कारवाई करण्यात आली. पुणे जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार लैली मच्छिंद्र गुडदावत हिला एक वर्षासाठी स्थानबद्ध करण्यात आले असून, तिला मध्यवर्ती कारागृह, नागपूर येथे ठेवण्यात आले आहे. ही कारवाई पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल, बारामती विभागाचे अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, दौंड उपविभागीय पोलीस अधिकारी बापुराव दडस यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

---

**चाकण बाजारात ६ कोटी ६५ लाखांची उलाढाल; भाजीपाला-पालेभाज्यांचे भाव तेजीत**

# हिरवी मिरची, वांगी, भोपळा, टोमॅटोची जोरदार आवक; कांद्याच्या दरात किंचित घसरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चाकण :** खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्डमध्ये रविवारी (दि. १ फेब्रुवारी २०२६) भाजीपाला व शेतीमालाची मोठ्या प्रमाणावर आवक झाली. हिरवी मिरची, वांगी, भोपळा आणि टोमॅटोची आवक लक्षणीय राहिली. कांद्याच्या दरात मात्र मागील आठवड्याच्या तुलनेत किंचित घसरण नोंदविण्यात आली. बाजारात एकूण ६ कोटी ६५ लाख रुपयांची उलाढाल झाली.



चाकण बाजारात कांद्याची एकूण ४,५०० क्विंटल आवक झाली असून ही आवक मागील आठवड्यापेक्षा सुमारे २,००० क्विंटलने कमी आहे. कांद्याचा कमाल दर १,८०० रुपयांवरून घसरून १,६०० रुपये झाला. बटाट्याची ३,००० क्विंटल आवक झाली असून भाव तुलनेने स्थिर राहिले. लसणाची आवक व दर दोन्ही घटल्याचे दिसून आले. हिरव्या मिरचीची ३२० क्विंटल आवक झाली असून प्रती क्विंटल ६,५०० ते ७,५०० रुपये भाव मिळाला.

फळभाज्यांच्या बाजारात टोमॅटो, कोबी, फ्लॉवर, वांगी, भेंडी, वाटाणा, ढोबळी मिरची यांची चांगली आवक झाली. पालेभाज्यांमध्ये मेथी, कोथिंबीर, पालक आणि शेपूची आवक वाढूनही त्यांचे दर तेजीत राहिले.

दरम्यान, जनावरांच्या बाजारातही व्यवहार उत्साही राहिले. गाई, बैल, म्हशी तसेच शेळ्या-मेंढ्यांची मोठ्या प्रमाणावर विक्री झाली. एकूणच चाकण बाजारात रविवारी भाजीपाला, पालेभाज्या व जनावरांच्या व्यवहारामुळे बाजारपेठ गजबजलेली दिसून आली.

---

### आचारसंहिता पाळा, अन्यथा कठोर कारवाई – डीसीपी डॉ. राजकुमार शिंदेंचा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी काळभोर :** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर परिसरात राजकीय हालचालींना वेग आला असून, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासन सज्ज झाले आहे. आदर्श आचारसंहिता लागू असताना कोणत्याही प्रकारचा कायद्याचा भंग सहन केला जाणार नाही. नियम मोडणाऱ्यांवर थेट व कठोर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट आणि खणखणीत इशारा पुणे शहर परिमंडळ ६ चे पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे यांनी दिला.

लोणी काळभोर पोलीस ठाण्यात शनिवारी (ता. ३१) निवडणूक अनुषंगाने आयोजित आढावा बैठकीत डॉ. शिंदे बोलत होते. यावेळी सहाय्यक पोलीस आयुक्त अनुराधा उदमले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. बैठकीत निवडणूक काळात उद्भवू शकणाऱ्या संभाव्य तणावपूर्ण परिस्थितीचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

डॉ. शिंदे यांनी सांगितले की, परिसरातील २१ अट्टल गुन्हेगारांना तडीपार करण्यात आले असून गुन्हेगारी प्रवृत्तीवर पोलिसांची करडी नजर आहे. संवेदनशील भागांत मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. कोणाकडून धमकी किंवा दबाव येत असल्यास नागरिकांनी तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा. प्रत्येक मतदाराने निर्भयपणे मतदान करून लोकशाही अधिक बळकट करावी, असे आवाहन त्यांनी केले.



## भविष्यातील विकासाचा आराखडा, पण समावेशकतेचा प्रश्न कायम

# विकासाला प्राधान्य देणारा अर्थसंकल्प!

### भांडवली खर्चावर भर; पायाभूत सुविधांना चालना, मात्र सामान्यांच्या प्रश्नांवर मर्यादित उत्तर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी संसदेत आपला नववा केंद्रीय अर्थसंकल्प सादर केला आहे. या बजेटमध्ये देशाच्या सर्वांगीण विकासासाठी सरकारने तीन महत्त्वाचे कर्तव्य निश्चित केल्याचे त्यांनी सांगितले. विकास, लोकांच्या वाढत्या आकांक्षा आणि 'सबका साथ, सबका विकास' या तीन सूत्रांवर हे बजेट आधारित असल्याचे त्यांनी सांगितले. या अर्थसंकल्पात रोजगारनिर्मिती, आरोग्य सेवा, गुंतवणूक आणि पायाभूत सुविधा (इन्फ्रास्ट्रक्चर) यांना विशेष प्राधान्य देण्यात आले आहे. तरुणांसाठी रोजगाराच्या संधी वाढवणे, आरोग्य सेवांचा दर्जा सुधारणा आणि उद्योगांना चालना देण्यासाठी गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यावर सरकारचा भर आहे. यासोबतच जागतिक पातळीवरील आर्थिक अनिश्चितता आणि देशांतर्गत मागणी यांचा समतोल साधण्यासाठीही सरकारने काही महत्त्वाचे निर्णय जाहीर केले आहेत. अर्थव्यवस्था स्थिर ठेवत विकासाचा वेग कायम राखणे, हे या बजेटचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे अर्थमंत्र्यांनी नमूद केले एकूणच, सर्वसामान्य नागरिकांचे जीवनमान सुधारण्याच्या दृष्टीने आणि देशाच्या दीर्घकालीन प्रगतीसाठी हा अर्थसंकल्प महत्त्वाचा मानला जात आहे.



**विक्रमी अर्थसंकल्प सादर**

● केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज (दि. १ फेब्रुवारी) आपला विक्रमी ९ वा अर्थसंकल्प सादर केला. हा त्यांच्या नव्याने बांधण्यात आलेल्या कर्तव्य भवन मधील पहिला अर्थसंकल्प ठरला आहे. त्या नव्या संसद भवनात अर्थसंकल्प सादर करणाऱ्या देशाच्या पहिल्या अर्थमंत्री बनल्या आहेत. यंदाच्या अर्थसंकल्पाकडे देशातील मध्यम वर्गाचे तसेच पदेशातील गुंतवणूकादारांचे देखील मोठे लक्ष लागून राहिले होते. जागतिक अस्थिरता आणि रोज बदलणाऱ्या टॅरिफच्या जगात भारत कशा प्रकारे आर्थिक स्थैर्य आणणार याकडे सर्वांचे लक्ष आहे. त्यामुळे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांचे अर्थसंकल्पीय भाषण महत्वाचे मानले जात आहे.

## सुधारणांना नवी गती देणारा अर्थसंकल्प पंतप्रधान नरेंद्र मोदी



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** देशात सध्या सुधारणांची एक प्रेरणादायी लाट सुरू असून, केंद्र सरकारने केलेले बदल भारतातील धाडसी, प्रतिभावान आणि नवोन्मेषी तरुणांना अभिव्यक्तीसाठी मुक्त आकाश देणारे असल्याचे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सलग नवव्यांदा सादर केलेल्या अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया देताना मोदी यांनी हा अर्थसंकल्प सुधारणांना नवी चालना देणारा असल्याचे स्पष्ट केले. पंतप्रधान मोदी म्हणाले की, हा अर्थसंकल्प कौशल्य, प्रमाण आणि शाश्वतता या तीन महत्त्वाच्या स्तंभांवर उभा आहे. देशाच्या विकासासाठी केवळ भांडवल किंवा पायाभूत सुविधा महत्त्वाच्या नसून, नागरिक हीच देशाची सर्वात मोठी संपत्ती आहे, या भूमिकेतून सरकारने लोकांमध्ये गुंतवणूक केली आहे, असे त्यांनी सांगितले. मोदी यांनी नमूद केले की, यंदाचा अर्थसंकल्प अद्वितीय स्वरूपाचा असून तो एकीकडे वित्तीय तूट कमी करण्यावर लक्ष केंद्रित करतो, तर दुसरीकडे उच्च भांडवली खर्च आणि वेगवान आर्थिक वाढ यांचा संतुलित मेळ साधतो. ही बाब अर्थव्यवस्थेसाठी दीर्घकालीन दृष्टिकोनातून महत्त्वाची असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. "हा अर्थसंकल्प केवळ आकड्यांचा खेळ नाही, तर देशाच्या भविष्यासाठीचा रोडमॅप आहे," असे सांगत मोदी यांनी स्पष्ट केले की, यामधून तरुणांना संधी, उद्योगांना बळ आणि अर्थव्यवस्थेला स्थैर्य मिळणार आहे. नव्या सुधारणांमुळे स्टार्टअप्स, कौशल्याधारित रोजगार आणि नवतंत्रज्ञान क्षेत्राला गती मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# अर्थसंकल्पात संरक्षणाला सर्वोच्च प्राधान्य

### ७.८४ लाख कोटींची विक्रमी तरतूद, लष्करी आधुनिकीकरणाला मोठी चालना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : देशाच्या राष्ट्रीय सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी २०२६-२७ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात संरक्षण क्षेत्रासाठी विक्रमी तरतूद जाहीर केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने यंदा संरक्षण खर्चासाठी तब्बल ७,८४,६७८ कोटी रुपये राखून ठेवले असून, हा आकडा मागील वर्षीच्या ६,८१,२१० कोटी रुपयांच्या तुलनेत लक्षणीय वाढ दर्शवतो.**



वाढत्या जागतिक अस्थिरतेच्या आणि भारतासमोरील बहुआयामी सुरक्षा आव्हानांच्या पार्श्वभूमीवर हा अर्थसंकल्प अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. राष्ट्रीय सुरक्षा, सीमांचे संरक्षण, लष्करी आधुनिकीकरण आणि 'आत्मनिर्भर भारत' या दीर्घकालीन ध्येयाला बळकटी देण्यासाठी संरक्षण बजेटमध्ये मोठी वाढ करण्यात आली आहे. शेजारील देशांसोबतचा तणाव, सीमावर्ती भागातील बदलती परिस्थिती आणि अलीकडील लष्करी मोहिमांमुळे सक्षम, सज्ज आणि आधुनिक सशस्त्र दलांची गरज अधिक ठळकपणे अधोरेखित झाली आहे. या पार्श्वभूमीवर संरक्षण क्षेत्राला भरीव निधी देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

यंदाच्या अर्थसंकल्पात भांडवली खर्चाला विशेष प्राधान्य देण्यात आले आहे. नवीन शस्त्रसामग्री, अत्याधुनिक उपकरणे, लढाऊ विमाने, ड्रोन, आधुनिक तोफखाना, नौदल जहाजे तसेच सीमावर्ती भागातील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली जाणार आहे. भांडवली बजेट सुमारे १.८० लाख कोटी रुपयांवरून २.१९ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढवण्यात आले असून, हा निधी भविष्यातील युद्ध गरजा लक्षात घेऊन वापरला जाणार आहे. संरक्षण क्षेत्रात स्वावलंबन साध्य करण्यासाठी सरकारने महत्त्वपूर्ण धोरणात्मक निर्णय घेतला आहे. संरक्षण खरेदीपैकी ७५ टक्क्यांहून अधिक खरेदी देशांतर्गत कंपन्यांकडून करण्याचे धोरण अधिक दृढ करण्यात आले आहे. यामुळे भारतीय संरक्षण उद्योग मजबूत होणार असून, आयातीवरील अवलंबित्व लक्षणीयरीत्या कमी होण्यास मदत होईल. स्वदेशी लढाऊ विमाने, क्षेपणास्त्र प्रणाली, हवाई संरक्षण यंत्रणा, रडार आणि सायबर सुरक्षेशी संबंधित प्रकल्पांमध्ये भारतीय कंपन्यांचा सहभाग वाढवला जाणार आहे. संरक्षण बजेटमधील मोठा हिस्सा सैनिकांचे वेतन, पेन्शन आणि ऑपरेशनल खर्चासाठी राखीव ठेवण्यात येतो. सैनिकांच्या सुविधा, आरोग्य सेवा, निवास व्यवस्था आणि कुटुंबीयांच्या कल्याणाशी कोणतीही तडजोड केली जाणार नसल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे. आगामी काळात संरक्षण खर्च देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या सुमारे २.५ टक्क्यांपर्यंत वाढवण्याचा सरकारचा मानस असून, सध्या हा खर्च अंदाजे १.९ टक्के आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात संरक्षण क्षेत्रासाठी साधारण १४ ते १५ टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली आहे. ही वाढ केवळ आकड्यापुरती मर्यादित नसून, ती लष्करी आधुनिकीकरण आणि धोरणात्मक क्षमतेत प्रत्यक्ष वाढ घडवणारी ठरणार आहे.

जमीन दल, नौदल आणि हवाई दलासाठी अंतिम खर्चाचे तपशील पुढील टप्प्यात स्पष्ट होतील; मात्र एकूणच सरकारची तयारी भक्कम असल्याचे चित्र आहे. नौदलाच्या क्षमतांमध्ये वाढ करण्यासाठी अर्थसंकल्पातून विशेष तरतूद करण्यात आली आहे. विमानवाहू जहाजांवरून कार्यक्षमतेने उड्डाण करू शकणाऱ्या नव्या पिढीच्या लढाऊ विमानांसाठी करार प्रक्रियेला गती मिळणार आहे. तसेच, पाण्याखालील क्षमतांचा विस्तार करण्यासाठी अत्याधुनिक स्टेल्थ पाणबुड्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली जाणार आहे. या पाणबुड्या दीर्घकाळ पृष्ठभागावर न येता कार्यरत राहू शकतील, ज्यामुळे सागरी सीमांवरील नजर अधिक तीक्ष्ण राहील. आधुनिक युद्धपद्धती लक्षात घेता ड्रोन आणि मानवरहित प्रणालींना अर्थसंकल्पात विशेष महत्त्व देण्यात आले आहे.

## चीनवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी निर्णायक पावले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** :नवी दिल्ली २०२६ च्या केंद्रीय अर्थसंकल्पाकडे आज संपूर्ण देशाचे लक्ष लागून असताना केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी संसदेत आपला नववा अर्थसंकल्प सादर केला. जागतिक भू-राजकीय तणाव, पुरवठा साखळीतील अस्थिरता आणि चीनवरील तांत्रिक अवलंबित्वाच्या पार्श्वभूमीवर यंदाच्या अर्थसंकल्पात सेमीकंडक्टर आणि दुर्मिळ पृथ्वी खनिजांबाबत (रेअर अर्थ) महत्त्वपूर्ण आणि दूरगामी घोषणा करण्यात आल्या आहेत. अर्थसंकल्पीय भाषण सुरू होताच देशाच्या अर्थव्यवस्थेची दिशा, औद्योगिक धोरण आणि भविष्यातील तंत्रज्ञानात्मक स्वावलंबन यावर केंद्र सरकारचा भर स्पष्ट झाला. सामान्य नागरिकांपासून ते उद्योग, स्टार्टअप्स, एमएसएमई आणि पायाभूत सुविधा क्षेत्रापर्यंत सर्वांवर परिणाम करणाऱ्या अनेक घोषणा यावेळी करण्यात आल्या. अर्थमंत्री सीतारामन यांनी जाहीर केले की इलेक्ट्रॉनिक्स मॅन्युफॅक्चरिंग सर्व्हिसेस (ईएमएस) पीएलआय योजनेची तरतूद ४०,००० कोटी रुपयांपर्यंत वाढवण्यात येणार आहे. यासोबतच, सेमीकंडक्टर उत्पादन आणि इलेक्ट्रॉनिक घटकांच्या निर्मितीसाठी असलेल्या योजनांनाही अधिक बळ देण्यात येणार आहे. भारताला चीनवरील अवलंबित्वातून मुक्त करण्यासाठी ओडिशा, केरळ, आंध्र प्रदेश आणि तामिळनाडू या राज्यांमध्ये दुर्मिळ पृथ्वी खनिजांसाठी समर्पित कॉरिडॉर उभारण्यात येणार आहेत. यासाठीही ४०,००० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या खनिजांचा वापर सेमीकंडक्टर, इलेक्ट्रिक वाहनं, संरक्षण उपकरणे आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. सेमीकंडक्टरविषयक घोषणांचा तात्काळ परिणाम शेअर बाजारात दिसून आला. अर्थसंकल्पातील घोषणेनंतर डिक्सन टेक्नॉलॉजीज, सीजी पॉवर तसेच इतर चिप निर्मितीशी संबंधित कंपन्यांच्या शेअर्समध्ये ६ टक्क्यांपर्यंत वाढ नोंदवण्यात आली. सरकारच्या स्पष्ट धोरणात्मक भूमिकेमुळे गुंतवणूकदारांचा तंत्रज्ञान क्षेत्रावरील विश्वास वाढल्याचे चित्र दिसून आले. तंत्रज्ञान क्षेत्राला मोठी चालना देत अर्थमंत्र्यांनी इंडिया सेमीकंडक्टर मिशन (आयएसएम) २.० लवकरच सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा केली. या मिशनअंतर्गत देशांतर्गत चिप उत्पादन क्षमता वाढवणे, संपूर्ण पुरवठा साखळी मजबूत करणे आणि भारताला सेमीकंडक्टर क्षेत्रात स्वावलंबी बनवणे हे प्रमुख उद्दिष्ट असेल. अर्थमंत्र्यांनी स्पष्ट केले की, केवळ चिप उत्पादन नव्हे तर डिझाइन, पॅकेजिंग, चाचणी आणि संशोधन या सर्व टप्प्यांवर भारताची मजबूत उपस्थिती निर्माण करण्याचा सरकारचा मानस आहे. याचबरोबर भारताला जागतिक बायोफार्मास्युटिकल उत्पादन

# आयकरदात्यांना मोठा दिलासा

### 1 एप्रिलपासून नवा आयकर कायदा लागू; रिटर्न भरणे अधिक सोपे होणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** १ एप्रिलपासून नवीन आयकर कायदा लागू करण्यात येणार असून, तो लवकरच अधिसूचित केला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. या नव्या कायद्यामुळे आयकर भरण्याची प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक आणि करदात्यांसाठी सोयीची होणार आहे. अर्थमंत्री सीतारामन यांनी सांगितले की, नवीन आयकर कायद्याअंतर्गत आयकर रिटर्नचे फॉर्म साधे आणि सुटसुटीत करण्यात येतील, जेणेकरून सामान्य करदात्यांना रिटर्न भरणे अधिक सोपे होईल. तसेच, अघोषित उत्पन्नाबाबतची मर्यादा १ कोटी रुपयांपर्यंत निश्चित करण्यात आली आहे, ही बाबही यावेळी स्पष्ट करण्यात आली. अर्थसंकल्पात जाहीर करण्यात आलेल्या नव्या तरतुदीनुसार, १ एप्रिलपासून नवीन आयकर फॉर्म जारी केले जातील.

यासोबतच, सुधारित आयकर रिटर्न दाखल करण्यासाठी करदात्यांना अधिक कालावधी उपलब्ध करून देण्यात येणार



आहे. महत्त्वाचे म्हणजे, आता सुधारित रिटर्न नाममात्र शुल्क भरून दाखल करता येणार आहेत, ज्यामुळे चुकांमुळे करदात्यांवर अतिरिक्त आर्थिक बोजा पडणार नाही. अर्थमंत्री सीतारामन यांनी आयकर रिटर्न भरण्याच्या अंतिम तारखांबाबतही स्पष्टता दिली आहे. आयटीआर-१ आणि आयटीआर-२ भरणाऱ्या व्यक्तींना ३१ जुलैपर्यंत रिटर्न दाखल करता येईल. ऑडिट नसलेल्या व्यावसायिक संस्था आणि ट्रस्टसाठी रिटर्न भरण्याची अंतिम तारीख ३१ ऑगस्ट निश्चित करण्यात आली आहे. या बदलांमुळे करदात्यांना अधिक वेळ मिळणार असून, घाईत रिटर्न भरताना होणाऱ्या चुका टाळण्यास मदत होईल. अनिवासी भारतीयांसाठी देखील आयकर प्रक्रियेत महत्त्वाचा बदल जाहीर करण्यात आला आहे. एनआरआय व्यक्तीकडून स्थावर मालमत्तेची विक्री झाल्यास, त्यावरील टीडीएस आता थेट रहिवासी खरेदीदाराकडून कापला जाईल. यापूर्वी या प्रक्रियेसाठी टीएएन आवश्यक होता, मात्र आता ही अट शिथिल करण्यात आली आहे. त्यामुळे एनआरआय आणि खरेदीदार दोघांसाठी करप्रक्रिया अधिक सुलभ होणार आहे. एकूणच, नवीन आयकर कायदा आणि सुधारित नियमांमुळे आयकर भरण्याची संपूर्ण प्रक्रिया अधिक करदाताकेंद्रित होणार असल्याचे चित्र आहे. फॉर्मची गुंतागुंत कमी करणे, सुधारित रिटर्नसाठी लवचिकता देणे आणि अंतिम तारखांमध्ये दिलेला दिलासा यामुळे मध्यमवर्गीय आणि सर्वसामान्य करदात्यांच्या अपेक्षांना हा अर्थसंकल्प काही अंशी उत्तर देणारा ठरत आहे. करप्रणाली अधिक सोपी आणि विश्वासार्ह करण्याच्या दिशेने अर्थसंकल्प २०२६ मधील आयकर सुधारणा एक महत्त्वाचे पाऊल मानल्या जात आहेत.

## अर्थसंकल्पावर राहुल गांधींची टीका



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** काँग्रेस खासदार आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मोदी सरकारने सादर केलेल्या २०२६ च्या केंद्रीय अर्थसंकल्पावर तीव्र टीका केली आहे. देशातील तरुण बेरोजगार असून शेतकरी अडचणीत असल्याचे नमूद करत, हा अर्थसंकल्प सुधारणा लागू करण्यास नकार देणारा आणि भारताच्या खऱ्या समस्यांकडे डोळेझाक करणारा असल्याचा आरोप त्यांनी केला. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी रविवारी संसदेत केंद्रीय अर्थसंकल्प सादर केल्यानंतर काही वेळातच राहुल गांधी यांनी सामाजिक माध्यमांवर प्रतिक्रिया व्यक्त केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या अर्थसंकल्पाचे कौतुक करत तो ऐतिहासिक असल्याचे म्हटले असताना, विरोधकांकडून मात्र तीव्र असंतोष व्यक्त होत आहे. राहुल गांधी यांनी 'एक्स' (माजी ट्विटर) या समाजमाध्यमावर पोस्ट करत लिहिले, "आज देशातील तरुणांकडे नोकऱ्या नाहीत. उत्पादन क्षेत्र कोलमडत आहे. गुंतवणूकदार भांडवल बाहेर काढत आहेत. देशांतर्गत बचत झपाट्याने कमी होत आहे. शेतकरी त्रस्त आहेत. येऊ घातलेले जागतिक आर्थिक धक्के – या सगळ्यांकडे अर्थसंकल्पात दुर्लक्ष करण्यात आले आहे. सुधारणा करण्यास नकार देणारा हा अर्थसंकल्प भारताच्या खऱ्या संकटांपासून अनभिज्ञ आहे." दरम्यान, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनीही अर्थसंकल्पावर नाराजी व्यक्त केली. मोदी सरकारकडे नव्या कल्पनांचा अभाव असून हा अर्थसंकल्प देशाच्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय आव्हानांना उत्तर देण्यात अपयशी ठरल्याचा आरोप त्यांनी केला.

## काय स्वस्त आणि काय महाग होणार

या अर्थसंकल्पाकडून सर्वसामान्य नागरिक, उद्योगजगत आणि व्यापाऱ्यांना मोठ्या अपेक्षा होत्या. विशेषतः काय स्वस्त होणार आणि काय महाग होणार, याकडे देशाचे लक्ष लागले होते.

**काय स्वस्त होणार?**

● अर्थसंकल्पीय भाषणात अर्थमंत्री सीतारामन यांनी सांगितले की, भारतात उत्पादित होणाऱ्या अनेक वस्तूंवरील सीमाशुल्क (कस्टम ड्युटी) कमी करण्यात येत आहे. यामुळे खालील वस्तू स्वस्त होण्याची शक्यता आहे :

स्वस्त

- कपडे
- चामड्याच्या वस्तू व चामड्याची उत्पादने
- सिंथेटिक पादत्राणे
- कर्करोग आणि मधुमेहावरील १७ औषधे शुल्कमुक्त
- लिथियम-आयन बॅटरी
- मोबाईल बॅटरी
- सौर ग्लास
- मिश्र वायू सीएनजी
- इलेक्ट्रिक वाहने (ईव्ही)
- मायक्रोवेव्ह ओव्हन
- विमान इंधन
- परदेश प्रवास खर्च



**काय महाग होणार?**

● दुसरीकडे, काही क्षेत्रांमध्ये कस्टम ड्युटी वाढवण्यात आली असून त्यामुळे पुढील वस्तू महाग होण्याची शक्यता आहे :

महाग

- दारू
- भंगार
- सिगारेट
- काही खनिजे
- पीव्हीसी फ्लेक्स शीट



## कांजीवरम सिल्क साडीची चर्चा

● अर्थसंकल्प दिनी निर्मला सीतारमण यांनी नेसलेली साडी नेहमीच चर्चेत राहते. अर्थसंकल्प सादर करण्यासाठी जी साडी निर्मला सीतारमण यांनी नेसली आहे, ती गडद मरून रंगाची आहे. नेहमीसारखा साध्या लूकमध्ये त्या दिसल्या. निर्मला सीतारमण यांनी आजच्या अर्थसंकल्प दिनी हँडलूम गडद मरून रंगाची कांचीवरम सिल्क साडी नेसली. साडीमध्ये हलक्या सोनेरी रंगाचे चेक्स म्हणजेच कट्टम आणि धाग्यांचे विणकामसह कॉफी कलर ब्राऊन बॉर्डर आहे. कट्टम साडी ही प्रामुख्याने आंध्र प्रदेश आणि तेलंगणातील पारंपरिक साडी आहे.